**वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती  पध्दती / प्रक्रियेबाबत.**

संदर्भ – रिझर्व बँक ऑफ इंडियाचे जा. क्रं. RBI/2021-22/25  Ref. No. DoSCO.ARG/SEC.01/08.91.001/2021-22 दिनांक 27/04/2021 इ.रोजीचे परिपत्रक.

संदर्भातील परिपत्रकान्वये रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी चालु सन 2021-2022 या आर्थिक वर्षापासून नागरी सहकारी बँकांनी वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्त करावयाच्या भागीदारी पेढी, संयुक्त जबाबदारी भागीदारी पेढी बाबत मार्गदर्शक सूचना केल्या असुन बँकेने त्यानुसार वैधानिक लेखापरिक्षक नियुक्त करणे अनुषंगाने परिपत्रकात नमूद केलेप्रमाणे प्रक्रिया पार पाडावयाच्या आहेत.

तसेच वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती  पध्दती / प्रक्रियेबाबतचे धोरण सुध्दा  बँकेच्या मा. संचालक मंडळाने संमत करणेचे आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडियाचे परिपत्रकातील महत्वाच्या बाबी व नियुक्तीबाबतची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे –

1) रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे मुंबई प्रादेशिक कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील नागरी सहकारी बँकांनी 31 जुलै पूर्वी मध्यवर्ती कार्यालय पर्यवेक्षण विभाग यांचेकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे.
2) रु. 15000 कोटीपेक्षा कमी जिंदगी (असेट) असणाऱ्या बँकांनी किमान 1 लेखापरिक्षण करणारी भागीदारी पेढी किंवा  संयुक्त जबाबदारी भागीदारी पेढी नियुक्त करणेची आहे.,
3) बँकेचे शाखाविस्तार व उलाढाल विचारात घेता  वैधानिक लेखापरिक्षणासाठी एक  किंवा त्यापेक्षा जास्त भागीदारी पेढी, संयुक्त जबाबदारी भागीदारी पेढी नियुक्त करावयाच्या बाबतचा निर्णय संबधित बँकेच्या संचालक मंडळाने करणेचा आहे.
4) नागरी सहकारी बँकेस वैधानिक परिक्षण करणारी भागीदारी पेढी, भागीदारी संयुक्त जबाबदारी पेढी जास्तीत जास्त 3 वर्षाचे कालावधीसाठी नियुक्त करता येईल. सदर कालावधीमध्ये बँकेस त्याला कमी करावयाचे  असलेस नागरी सहकारी बँकेला रिझर्व बँक ऑफ इंडियाची (पर्यवेक्षण विभाग) पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.तसेच, वैधानिक लेखापरिक्षण भागीदारी पेढी, संयुक्त जबाबदारी भागीदारी पेढी यांची 3 वर्ष पूर्ण झालेनंतर त्यांना परत 6 वर्षाचा कालावधी पूर्ण झालेनंतरच पुन्हा वैधानिक लेखापरिक्षक नेमता येईल.

5) वैधानिक लेखापरिक्षण करणाऱ्या भागीदारी पेढी किंवा संयुक्त जबाबदारी भागीदारी पेढी यांना आर्थिक वर्षासाठी जास्तीत जास्त 8 नागरी सहकारी बँकांचे लेखापरिक्षण करता येईल. मात्र, त्यांना नागरी सहकारी बँकाव्यतिरिक्त अन्य सहकारी संस्थाचे लेखापरिक्षण करणेची मूभा असेल.

6) वैधानिक लेखापरिक्षक यांना आदा करावयाची फि ही प्रचलित संबंधित शासनाचे नियमानुसार किंवा लेखापरिक्षण शिखर संस्थेच्या नियमानुसार निश्चित करून मा. संचालक मंडळाने त्याची शिफारस करणेची आहे. सदरची फि निश्चित करताना बँकेचा व्यवसाय, व्यवसायातील जोखीम, संगणकीकरणाची पातळी, प्रशासकिय नियंत्रण या बाबीचा सुध्दा विचार करणेचा आहे.

7) बँकेच्या संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षण कामात हलगर्जीपणा वा कसूर केलेचे संचालक मंडळाचे निदर्शनास आलेस त्याबाबतचा अहवाल लेखापरिक्षण पूर्ण झाल्यापासून 2 महिन्याचे आत रिझर्व बँकेस पाठविणेचा आहे.

8) नागरी सहकारी बँकांनी वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्त करावयाच्या भागीदारी पेढी, संयुक्त भागीदारी पेढी यांची पात्रता व निकष पुर्तता विचारात घेऊन बँकेच्या संचालक मंडळाने दोन नांवे प्राधान्य क्रम देऊन निश्चित करावयाची आहेत. नागरी सहकारी बँकांनी निश्चित केलेली दोन नांवाचा जरुर त्या कागदपत्रासहचा प्रस्ताव रिझर्व बँकेच्या पूर्व मान्यतेसाठी रिझर्व बँकेच्या पर्यवेक्षण विभाग कडे सादर करणेचा आहे. सदरचा प्रस्ताव प्रतिवर्षी 31 जुलैपुर्वी सादर करणेचा आहे.

9) नागरी सहकारी बँकेने नियुक्तीसाठी प्राधान्य दिलेल्या दोन भागीदारी पेढी किंवा संयुक्त पेढी संयुक्त जबाबदारी भागीदारी पेढी यांनी रिझर्व बँकेने लागु केलेला विहित नमुन्यातील **फॉर्म ब** (FORM B) मधील जरुर ती माहिती भरुन त्यावर भागीदारांच्या स्वाक्षरी करुन संबधित बँकेस सादर करणेचा आहे.

10) नागरी सहकारी बँकेने वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्त करावयाच्या भागीदारी पेढी, संयुक्त

भागीदारी पेढी बाबतचे प्रमाणपत्र रिझर्व बँकेने लागु केलेल्या **फॉर्म सी** (FORM C) या विहित नमुन्यात तयार करुन प्रस्तावासोबत पाठवावयाचा आहे.

## वैधानिक लेखापरिक्षकपेढीसाठी पात्रता अटी-

रिझर्व बँकेने बँकांचे संपलेल्या आर्थिक वर्षाअखेरील सांपत्तिक पत्रकानुसार जिंदगीचे रु. 15000/- कोटीपेक्षा जास्त, रु. 1000/- कोटी ते रु. 15000/- कोटी व रु. 1000/- कोटीपर्यंत असे 3 गट करुन नियुक्त करावयाचे भागीदारी पेढी किंवा संयुक्त जबाबदारी भागीदारी पेढी वैधानिक लेखापरिक्षण जबाबदारी भागीदारी पेढीमधील भागीदार यांच्या बाबत निकष दिले आहेत.तथापि, रु. 1000/- कोटीपर्यंत जिंदगी असणाऱ्या नागरी सहकारी बँकांना लागू होणारे नियम खालीलप्रमाणे

- बँकेने नियुक्त करावयाची भागीदारी पेढी, संयुक्त वैधानिक लेखापरिक्षण जबाबदारी भागीदारी पेढी मध्ये किमान 2 पूर्ण वेळ सनदी लेखापाल भागीदार पाहिजेत.तसेच, ते त्या पेढीमध्ये किमान 3 वर्ष कार्यरत असले पाहिजेत.त्यातील किमान एक (1) सनदी लेखापाल FCA असणे आवश्यक आहे.
- रु. 1000/- कोटीपर्यंत जिंदगी असणाऱ्या नागरी सहकारी बँकांनी  वैधानिक लेखापरिक्षण भागीदारी पेढी, भागीदारी पेढी किंवा संयुक्त जबाबदारी भागीदारी पेढी  वैधानिक लेखापरिक्षण जबाबदारी भागीदारी पेढीमधील भागीदार हा संगणकीकरणाच्या / माहिती तंत्रज्ञानाचा वापर विचारात घेता तो CISA /DISA असलाच पाहिजे असे बंधन नाही. मात्र, बँकेच्या दृष्टीने तसा असणे हितावह आहे.
- नागरी सहकारी बँकांनी  वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्त केलेल्या भागीदारी पेढी, भागीदारी संयुक्त जबाबदारी पेढी  भागीदारांना  लेखापरिक्षणाचा पुरेसा अनुभव (किमान 6 वर्ष) पाहिजे. या अनुभवामध्ये अन्य बँकेचे वैधानिक लेखापरिक्षण / व्यापारी बँकांच्या शाखांचे लेखापरिक्षण यांचा समावेश असेल.
- नागरी सहकारी बँकांनी  वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्त केलेल्या भागीदारी पेढी, संयुक्त भागीदारी पेढीमधील भागीदारा व्यतिरिक्त लेखापरिक्षणासाठी नियुक्त केलेले शिकाऊ क्लार्क / कर्मचारी  यांना हिशोब लेखनाचे ज्ञान व अनुभव असला पाहिजे. अशा कर्मचाऱ्यांची संख्या किमान आठ(8) असावी जे  किमान एक (1) वर्ष सदर पेढीत कार्यरत असावेत.मात्र, भागीदारी पेढी, संयुक्त भागीदारी पेढीमधील इतर कर्मचारी जे बँक लेखापरिक्षणाचा भाग नसतील त्यांना  ही अट लागु असणार नाही.
- नागरी सहकारी बँकांचे लेखापरिक्षणासाठी नियुक्त करावयाच्या भागीदारी पेढी, संयुक्त भागीदारी पेढी यांना नागरी सहकारी बँकांच्या अथवा त्यांच्या शाखांच्या लेखापरिक्षणाचा अनुभव असला पाहिजे. त्यादृष्टीने त्यांना सहकाराविषयी जरुर ती माहिती पाहिजे. त्याचबरोबर नागरी सहकारी बँक ज्या भागात काम करते तेथील भाषेचे ज्ञान असावे.
- अशा पेढीतील कोणताही भागीदार त्या बँकेच्या अन्य ऑडिट व इतर कामामध्ये सहभागी असता कामा नये.
- वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती  पध्दती / प्रक्रियेबाबत चे धोरण बँकेने तयार करुन ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेचे आहे.

सदरचे धोरण बँकेच्या मा.संचालक मंडळ सभा दिनांक 30/04/2021 ठराव क्रं.  22 अन्वये मंजूर